Role of Fire Service: - The Service was expected to focus on fighting fires, and the law constrained what they could do. Since then the role of the Fire Service has changed a great deal. As a result, under the new Act, Fire and rescue Authorities now have a range of statutory duties to:-

- Promote Fire Safety; and
- To prepare for:
    - fighting fires and protecting people and property from fires;
    - Rescuing people from Road Traffic Accidents; and
    - Dealing with other specific emergencies, such as flooding or terrorist attack which are set out by Statutory Order and can be amended in line with how the role of the Service may change in the future. In addition, all Fire and Rescue authorities will be able to do other things to respond to the particular needs of their communities and the risks they face. The Act achieves this through:
- ensuring that fire and rescue authorities can do things that are not specifically set out in the act but which will help them meet their statutory duties;
- Giving authorities powers to prepare properly for other risks to life and the environment - for example they can buy equipment and train and deploy staff to undertake activities that they judge to pose a risk to life or the environment in their area; and allowing authorities, where they have capacity, to use staff and equipment they believe appropriate. This new framework of powers and duties will equip Fire and rescue authorities to meet the challenges of the 21st century. It puts prevention on an equal footing with intervention and enables individual Fire and Rescue authorities, for the first time, to decide in consultation with their communities how and where to deploy their resources. The Act therefore provides a stronger basis for Fire and Rescue authorities' ability to respond to the range of risks set out in their Integrated Risk Management Plans the Act recognizes the wider role of the Service now plays and provides the flexibility to adapt to how the Service may change in the future.

History of NMC Fire and Emergency Services :-

कुठेही आग लागल्यानंतर स्वत:चा जीव धोक्यात टाकून नागरिकांना सुखरूप बाहेर काढण्याची महत्त्वाची जबाबदारी अग्निशमन विभाग करतो.

-पूर्वीच्या काळी अग्निशमन विभाग अद्ययावत नसल्याने मोठ मोठ्या आगींमध्ये मोठे नुकसान होत होते. कालांतराने या विभागाची गरज लक्षात घेऊन आग विझविण्यासाठीच्या साधनांचा शोध लागला.

-1864 च्या काळात नागपूर नगरपालिका होती. त्यावेळी कुठे आग लागली की हॅण्डपंप सारख्या साधनाने ती विझविली जात होती. ड्रममधील पाण्याचा त्या हॅण्डपंपच्या साहाय्याने आगीवर मारा केला जात होता.

-त्यानंतर इंग्लंडवरून 'मेरी वेदर फायर इंजिन' आले. 200 लिटरची क्षमता असणाऱ्या या इंजिनिच्या साहाय्याने आग विझविली जात होती.

-आगीच्या वाढत्या घटना लक्षात घेता नागपुरात फायर स्टेशन व्हावे यावर चर्चा सुरू झाली. 1927 मध्ये गंजिपेठ येथे पहिले फायर स्टेशन सुरू झाले. याला नगर स्टेशन असे नाव देण्यात आले होते.

-सुमारे 64 वर्षांपूर्वी महाल येथील राजवाड्याला आग लागली होती. त्यावेळी मेरी वेदर फायर इंजिन आणि कामठी येथून एक इंजिन आग विझविण्यासाठी आणले होते. बैलगाडीवर आणलेल्या या इंजिनने आग विझविण्याचे काम केले. मात्र आगीमुळे मोठे नुकसान झाले होते.

-नागपुरातील ज्या भागात गर्दी आहे, तिथे फायर स्टेशन सुरू करण्याचा विचार मांडण्यात आला. यानुसार महाल, कॉटनमार्केट आणि पाचपावली असे तीन स्टेशन तयार करण्यात आले.

-केवळ आग विझविणारे यंत्र किंवा फायर स्टेशन असूनच उपयोग नाही तर संवाद तंत्रज्ञानही प्रभावी असावे यावर चर्चा झाली. त्यामुळे परिसरावर देखरेख ठेवण्यासाठी महाल परिसरात मचान तयार करण्यात आले होते. या मचानावरून 24 तास वॉच ठेवला जात होता.

-आज शहरात ११ स्टेशन कार्यरत आहेत. यात सिव्हील लाइन, कॉटनमार्केट, गंजीपेठ, लकडगंज, सक्करदरा, कळमना, सुगतनगर, नरेंद्रनगर, त्रिमूर्तीनगर, वाठोडा व पारडी यांचा समावेश आहे. कळमना येथे एक प्रशिक्षण केंद्रही सुरू करण्यात आले.

-आग लागल्याची घटना घडल्यानंतर पाणी आणून ती विझविण्याचे प्रयत्न करणे यात खूप वेळ निघून जायचा. यामुळे मोठे नुकसान होत होते. यावर तोडगा काढण्यासाठी शहरात 97 ठिकाणी फायर हायड्रंट बसविण्यात

आले. पाण्याच्या मुख्य वाहिनीवर हे बसविण्यात आले होते. पोस्ट ॲण्ड पिलर असे नाव याला देण्यात आले होते. केवळ अग्निशमन विभागच यातून पाणी घेऊ शकत होता.

-मात्र अतिक्रमणामुळे आज फायर हायड्रंट शिल्लक राहिले नाही. अग्निशमन विभागाने 116 फायर हायड्रंटचा प्रस्ताव शासनाला दिला आहे. यासाठी निधीही उपलब्ध करून दिला जात आहे.

-शहरात 13 फायर स्टेशनची गरज आहे. यानुसार 872 मनुष्यबळाला मान्यताही देण्यात आली आहे.

-2005 मध्ये बैद्यनाथ चोकातील एका इमारतीला लागलेल्या आगीची भीषणता आजही कर्मचारी विसरू शकत नाही. भंगार साहित्य असलेली ही इमारत पत्त्यांच्या बंगल्यासारखी कोसळली होती. यात रमेश ठाकरे हे जवान शहीद झाले होते. यात 9 लोकांचा मृत्यू झाला होता. लोखंडे परिवाराला सुखरूप बाहेर काढण्यात आले होते. कळमना येथील प्रादेशिक केंद्राला रमेश ठाकरे यांचे नाव देण्यात आले आहे.

-2003 मध्ये पाचपावली येथील एका घरात गॅस लिक झाला होता. सहा जवान घटनास्थळी पोहोचले. कुटुंबातील सर्वांना बाहेर काढून अग्निशमन जवान आत घुसले. मात्र त्या कुटुंबातील एकाने बाहेर पडताना स्विच सुरू केल्याने मोठा स्फोट झाला. यात प्रभू कुहीकर हे जवान शहीद झाले होते. तीन जवान जखमी झाले होते.

-कळमना येथे 2016 मध्ये केमिकल कंपनीला आग लागली होती. बॉयलरचा स्फोट झाल्याने 11 जणांचा यात मृत्यू झाला होता. तीन दिवस चाललेल्या या आगीतून जवानांनी आपला जीव धोक्यात टाकून काहींना सुखरूप बाहेर काढले.

-एका अवैध कोल्ड स्टोअरेजमध्ये गरजेपेक्षा जास्त साहित्य ठेवण्यात आले होते. ही इमारत पडल्याने 17 जणांचा मृत्यू झाला होता. अशा आपत्तीच्या काळातही अग्निशमन विभागाने धावून जात 20 जणांचे प्राण वाचविले होते.

-करोनाच्या काळातही अग्निशमन जवानांनी मोठे मदतीचे काम केले. प्रसंगी मृतदेहांनी अग्निदेण्याचे कामही त्यांना करावे लागले.

-अग्निशमन विभागाकडून शाळा-महाविद्यालयात मोठ्या प्रमाणात जनजागृती मोहीम राबविण्यात येते.

उपलब्ध साधने आणि गरज

-मनपा अग्निशमन विभागाकडे आज 19 अग्निशमन गाड्या आहेत. डी वॉटरिंग पंप 57, चेन सॉ 51, उंच

इमारतीवर आग लागल्यानंतर वापरण्यासाठी टीटीएल 1 आहे. हे मशीन 42 मिटरवरची आग विझवू शकते.

-32 मिटरचा हायड्रोलिक प्लॅटफॉर्म 1, लाइफ जॅकेट 52, लाइफ बॉय 52, रबर बोट 4, वॉटर मिस्ट फायर बाइक 4, केमिकलची आग लागली तर फोम टेंडर, अशी साधने अग्निशमन विभागाकडे आहेत.

-आगीसह इतर नैसर्गिक आपत्तीच्या वेळीही अग्निशमन विभाग मदतीसाठी सदैव तत्पर असतो. शहरात येणाऱ्या व्हीव्हीआयपीच्या सुरक्षेसाठीही अग्निशमन विभागाची गाडी तैनात असते.

-आज अग्निशमन विभागाकडे आग विझविण्यासाठी विविध साधने असली तरी शहरात वाढत्या उंच इमारती लक्षात घेता साधनसामुग्रीही अद्ययावत करण्याची गरज आहे.

-100 मिटरच्या इमारती तयार होत असल्याने 70 मिटर हायड्रॉलिक प्लॅटफॉर्म मशीनची शहराला गरज आहे. यासाठीही प्रशासकीय प्रक्रिया सुरू झाली आहे.

-14 नवीन अग्निशमन गाड्या आणि 3 नवे फायर स्टेशन तयार करण्यासाठी 60 कोटींचा निधी मंजूर झाला आहे.

-अपुरे मनुष्यबळ लक्षात घेता 350 अग्निशमन कर्मचारी भरती करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

-अनेक भागात रस्ते अरुंद असल्याने अग्निशमन गाड्या पोहोचतच नाही. त्यामुळे आग विझविण्यासाठी छोट्या गाड्यांची गरज आहे. 4 छोट्या गाड्या खरेदी करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

-शहराची वाढती लोकसंख्या आणि विस्तारणारे शहर लक्षात घेता 22 फायर स्टेशनची गरज आहे.

-आग प्रतिबंधक जीव संरक्षक उपाययोजना 2006 व सुधारित अधिनियम 2023 नॅशनल बिल्डिंग कोड 2016 या कायद्यानुसार अग्निशमन विभाग कार्य करतो.

We Serve to Save